॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी




# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## वार्षिक वृत्त - राष्ट्रीय सौर शके १९४२-४३

## (एप्रिल २०२०- मार्च २०२१)

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## वार्षिक वृत्त - शके १९४२
## (२०२०-२०२१)

सस्नेह नमस्कार!

गेले सुमारे दीड वर्ष कोरोना विषाणूमुळे आलेल्या साथीमुळे जगातील व्यवहार काही काळ ठप्प झाले, परंतु त्यानंतर लवकरच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्व काही 'न्यू नॉर्मल' अर्थात काळाशी जुळवून घेत सुरू झाले. या परिस्थितीला शिक्षणक्षेत्र देखील अपवाद नव्हतेच! ज्ञान प्रबोधिनीमध्ये देखील सर्व औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाचे उपक्रम अविरतपणे चालू राहिले - अर्थात काही प्रमाणात आवश्यकतेप्रमाणे त्यांचे स्वरूप बदलून!

ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतर्फे विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध उपक्रम योजले जातात, ज्यांच्याद्वारे ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण विचारांचा प्रसार केला जातो. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध शैक्षणिक उपक्रमांचे सैद्धांतीकरण करणे, शिक्षक आणि शिक्षण प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि आवश्यक साधन-निर्मिती करणे यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेमध्ये काम केले जाते. हे उपक्रम २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात दूरस्थ पद्धतीने (ऑनलाईन) झाले. तसेच शक्य तेव्हा पुरेशी काळजी घेत प्रत्यक्ष भेटूनही सुरू राहिले. दूरस्थ उपक्रमांचा फायदा म्हणजे पुण्याबाहेरील अनेकांना (प्रवासाशिवाय) सहभागी करून घेता आले.

शैक्षणिक उपक्रम संशोधिकेमार्फत ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षण विस्तारकार्य आपणा सर्वांच्या सहकार्याने विस्तारता आले याचा आनंद होत आहे. प्रबोधिनीच्या शिक्षण विस्तार कार्यात आपणा सर्वांच्या सहभागाच्या अपेक्षेत.

सस्नेह,

प्रशांत दिवेकर (विभाग प्रमुख) अमर परांजपे (उपविभाग प्रमुख)

सहविचार समिती सदस्य

ओंकार बाणाईत, प्रकाश रणनवरे, पूर्वा दीक्षित, मृण्मयी वैशंपायन

### ⁕ 'अविरत शिकणे हेच जिणे' व्याख्यानमाला

मार्च २०२० मध्ये संचारबंदी सुरू झाल्यावर प्रत्यक्ष शाळेत जाऊन किंवा एखाद्या वास्तूत जाऊन शिकणे जरी बंद झाले होते तरी प्रबोधिनीमध्ये लगेचच ऑनलाईन शिक्षणाचे अनेक प्रयोग या काळात केले गेले. शिक्षण अविरत चालूच होते व अजूनही आहे. संचारबंदीच्या काळातील हे सर्व शिक्षणाचे प्रयोग सर्वांपर्यंत पोचवावेत, या हेतूने दि.१३-१५ मे या कालावधीत 'अविरत शिकणे हेच जिणे' ही अनुभवकथनांची व्याख्यानमाला फेसबुक लाईव्हवर घेण्यात आली.

यामध्ये 'संचारबंदीतील ई- शाळा' (ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या अनुभवावर आधारित प्रशालेचे प्राचार्य वाच. मिलिंद नाईक यांनी केलेली मांडणी), 'संचारबंदीतील कृतिशील शाळा' (ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या उपक्रमांसंबंधी प्रा. मधुरा लुंकड, विभागप्रमुख, इंग्रजी माध्यम यांनी प्रा. शिवराज पिंपुडे यांच्यासमवेत केलेली मांडणी) तसेच 'संचारबंदीतील मुक्त शाळा' (प्रबोधिनीतील विविध विभागांद्वारे आयोजित कार्यशाळा व अन्य उपक्रमांद्वारे झालेले मुक्त शिक्षण याविषयी वाच. मेधाविनी वाटवे यांनी केलेली मांडणी) असे विषय मांडले गेले.

फेसबुक लाईव्ह या माध्यमातून झालेली ही व्याख्यानमाला जवळपास २०० ते ३०० जणांनी प्रत्यक्ष ऐकली तर एकूण ३५०० लोकांकडून नंतरही ऐकली गेली.

### ⁕ पुस्तक प्रकाशन

दि. ६ सप्टेंबर रोजी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन (JPF) यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला प्रकल्प करूया' या पुस्तकाचा अनुवाद असलेल्या 'Learning to Explore Project by Project' या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी एक वेबिनार योजण्यात आला. या कार्यक्रमाला श्री. विवेक सावंत (मेन्टॉर, एम.के.सी.ल.) हे प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**पुस्तक प्रकाशन कार्यक्रम दुवा –**
https://www.youtube.com/watch?v=VmJ98umdUn8

### ⁕ नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासगट

विभागात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यासगट तयार केला व त्याद्वारे धोरणाचा अभ्यास करत भविष्यात कामाच्या नवीन संधी कोणत्या व कोणते काम वाढवायला हवे याबद्दल विचार झाला.

### ⁕ स्वयं अध्ययन वर्ग अभ्यासगट

वर्षभर 'स्वयं अध्ययन' या विषयावरचा अभ्यासगट चालला. प्रबोधिनीतील शालेय विद्यार्थ्यांवर काम करणाऱ्या गटापैकी २० सदस्य यामध्ये होते.

एकूण २० सत्रांची चार भागात विभागणी करून त्याची सराव सत्र एका लहान गटावर घेण्यात आली – स्वयं अध्ययन कौशल्य परिचय (उद्दिष्ट निश्चिती, नियोजन, अभ्यास पायऱ्या, सवयी), अध्ययन कौशल्य (वाचन, लेखन, श्रवण, निरीक्षण, प्रश्न), माहितीची पुनर्मांडणी (तक्ते, सारशब्द, नोंदी), परीक्षेची तयारी (परीक्षा तंत्र, उजळणी, प्रश्न प्रकार, स्मरण कौशल्य). सराव सत्रानंतर या गटाने वर्षभरात ४ कार्यशाळा घेतल्या.या अभ्यासगटाच्या निमित्ताने सर्व आशयाचे एकत्रीकरण झाले. सर्व सत्रांच्या पारदर्शिका व ध्वनिचित्रमुद्रणे तयार झाली.



## ※ ऑनलाईन कार्यशाळा

एरवी सुट्टीमध्ये विभागातर्फे विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येते. टाळेबंदी झाल्यावर ऑनलाईन स्वरूपात कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यांचे तपशील पुढीलप्रमाणे –

| क्र. | कार्यशाळेचे नाव | कालावधी | कोणासाठी | एकूण सहभागी |
|---|---|---|---|---|
| १. | अभ्यासातील स्वावलंबन (अभ्यास कौशल्ये, अभ्यास तंत्रे, अभ्यास सवयी इ.) | ८ जून ते १२ जून | ९ वी, १० वी विद्यार्थी (पुणे, धुळे, गोवा, कोल्हापूर, सातारा, ठाणे, नाशिक इ.) | ११० |
| २. | एक मिनिट चित्रफित निर्मिती (लेखनकला, दिग्दर्शन, ध्वनिमुद्रण, संकलन इ. तंत्रे-कौशल्ये) | ८ जून ते १२ जून | खुला गट (वय वर्षे १० ते ७२) | ८४ |
| ३. | विज्ञान कार्यशाळा (विद्युतधारा, दाब, पर्यावरण व्यवस्थापन, प्रकाश) | १० जून ते १३ जून | ८वी, ९वीतील विद्यार्थी (औरंगाबाद, बीड, नाशिक, डोंबिवली, कोल्हापूर, पुणे) | २६ |
| ४. | चला कल्पक बनूया (कृतिकार्यांसह) (सर्जनशीलतेसाठी आवश्यक कौशल्ये, प्रतिभासंपन्न लेखन, वैज्ञानिक सर्जनशीलतेकडून समस्या परिहाराकडे इ.) | १२ जून ते १४ जून | ६ वी ते ८ वी विद्यार्थी | ४७ |
| ५. | तंत्रज्ञान-स्नेही अध्यापन (विषय अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर) | १० जून ते १३ जून | शिक्षक | १४१ |



## ज्ञान सेतू

**※ भास्कर संस्कार केंद्राच्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण**

एप्रिल ते जून २०२० या कालावधीत पार्वतीपूर, आसाम येथील विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ पद्धतीने अभ्यास वर्ग घेण्यात आले. या अंतर्गत अकाउंटन्सी (१३ सत्रे), संगणक (२१ सत्रे), इंग्रजी (१५ सत्रे) या विषयांची सत्रे घेण्यात आली. शिकवणे आणि सराव असे या सत्रांचे स्वरूप होते. टाळेबंदीमुळे आलेल्या प्रश्नांवर मात करण्यासाठी ही योजना करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना विषयांचे प्रशिक्षण तर मिळालेच, त्याशिवाय ज्ञानसेतूचे कार्यकर्ते पार्वतीपूरच्या विद्यार्थी व कार्यकर्ता गटाशी जोडून ठेवण्याचे साधनही मिळाले. पार्वतीपूरच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानसेतू कार्यकर्त्यांसाठी आसामी-सदनी या भाषा शिकवण्यासाठी चार सत्रे योजलेली होती. तसेच अनौपचारिक संवाद व्हावा म्हणून एक खेळाचे सत्रही योजले होते.

**※ ज्ञानसेतू मेळावा**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १५ ऑगस्ट रोजी ज्ञान सेतू मेळाव्याचे आयोजन यु ट्युब लाईव्हवर करण्यात आले होते. या निमित्त वार्षिक आढावा घेतला व पोस्टर तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ब्रिगेडियर अभय भट उपस्थित होते. त्यांनी 'Building bridges using education as a tool' या विषयावर त्यांचे प्रत्यक्ष कामाचे अनुभव देत मार्गदर्शन केले. मेळाव्याचा समारोप प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी केला.

**※ अभ्यास साहित्य**

ऑगस्ट ते जानेवारी या कालावधीत आसाम, जम्मू, छत्तीसगड या राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ई-साहित्य, सात ध्वनिचित्रफिती आणि दोन लेख आपण पाठविले. माहितीबरोबर घरच्या घरी प्रयोग करून बघता येतील असे विज्ञानातील संकल्पनांवर आधारित साहित्य पाठवण्यात आले.

**※ ज्ञान सेतू कट्टा**

ज्ञान सेतूच्या कार्यकर्त्यांशी जोडले जावे, नवीन कार्यकर्त्यांपर्यंत ज्ञान सेतू हा प्रकल्प पोहचावा ह्या हेतूंनी सप्टेंबर महिन्यापासून या कार्यक्रमाला सुरुवात झाली. दर महिन्याला कार्यकर्त्यांसाठी दूरस्थ पद्धतीने कार्यक्रम यानिमित्त योजले गेले.

**※ विद्यार्थी प्रशिक्षण**

♦ नोव्हेंबर- फर्ग्युसन महाविद्यालयाच्या 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या गटासाठी गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र या विषयांच्या ७० विद्यार्थ्यांसाठी-चित्रफिती करण्याच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात संहितालेखन, चित्रीकरण, संकलन याबद्दल मार्गदर्शन केले गेले. प्रशिक्षण झाल्यानंतर एकूण १८ चित्रफिती करण्यात आल्या.

♦ २ फेब्रुवारी- बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी मध्ये कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण- मागच्या वर्षी प्रशिक्षण झाल्यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ६ शाळांमध्ये कार्यशाळा घेतल्या होत्या, त्याचा कौतुक समारंभ यानिमित्त करण्यात आला आणि त्यानंतर झालेल्या दिवसभराच्या प्रशिक्षणामध्ये ४० विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होते.

♦ ६ व ७ फेब्रुवारी-'स्व'-रूपवर्धिनी या संस्थेच्या शाखा घेणाऱ्या गटाचे ज्ञान सेतूचे प्रशिक्षण. विज्ञान दिनानिमित्त वेगवेगळ्या शाखांवर प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या मार्फत अशा कार्यशाळा योजणे असा याचा हेतू होता.

**※ विविध प्रसार माध्यमांतून कामाचा प्रचार**

अधिकाधिक जणांपर्यंत हा प्रकल्प पोहचावा आणि अधिकाधिक कार्यकर्ते सहभागी व्हावे या हेतूने वर्षभरात ज्ञान सेतूच्या समाज माध्यमांवर काम केले. यामध्ये वेबसाईट तयार

करणे, फेसबुकवरील पृष्ठ, इंस्टाग्रामवरील पृष्ठ तयार करणे आणि साप्ताहिक वारंवारितेने अद्ययावत करणे समाविष्ट होते. त्याशिवाय युट्यूब चॅनेल सुद्धा सक्रिय आहे.

### ❊ विशेष योजना

एप्रिल महिन्यामध्ये ज्ञान सेतू प्रकल्पांतर्गत आंतरवासिता कार्यक्रमाचे (इंटर्नशीप प्रोग्राम) चे आयोजन करायचे ठरले, त्याची पूर्वतयारी मार्च महिन्यामध्ये करण्यात आली.

| दिनांक | कार्यक्रम |
|---|---|
| १४ ते १७ सप्टेंबर | ज्ञान सेतू कार्यकर्त्यांचे अनुभव कथन (जम्मू, मेघालय, मणिपूर, झारखंड, आसाम) |
| २४-२५ सप्टेंबर | राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित ऑनलाईन प्रश्नमंजूषा |

**विशेष कार्यक्रम** : १ डिसेंबर पासून ज्ञान सेतू कट्टा अंतर्गत Know Our Country अशी मालिका सुरू केली, ज्यात त्या राज्याची संस्कृती, खेळ, पर्यटन, विशेषता या दृष्टीने ओळख होणे हे मुख्य उद्दिष्ट होते. त्या ठिकाणी अनेक वर्षे काम करणाऱ्या व्यक्तींचे अनुभव कथन, प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांच्याशी संवाद असे याचे स्वरूप होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रभरातून मुख्यतः महाविद्यालयीन विद्यार्थी ऑनलाईन सहभागी झाले.

| दिनांक | राज्य | वक्ते |
|---|---|---|
| २६ डिसेंबर | मणिपूर | आय.ए.एस.हृषीकेश मोडक (मणिपूर केडर), वीणाताई बेडेकर (३ वर्षे मणिपूर मध्ये कामाचा अनुभव) |
| ३१ जानेवारी | जम्मू | आय.पी.एस. श्रीधर पाटील (जम्मू) |
| ६ मार्च | आसाम | आय.ए.एस. निसर्ग हिवरे (करीमगंज), बा.कमलाकांत (विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग) |
| २७ मार्च | झारखंड | डॉ. शुभ्रा द्विवेदी (मुख्य कार्यकारी अधिकारी, सीड्स) |

ज्ञान-सेतू

*Connecting through knowledge exchange*

## छोटे सायंटिस्ट्स उपक्रम

### ✻ वार्षिक कार्यक्रम

ज्ञान प्रबोधिनी व केपीआयटी टेक्नॉलॉजीज् यांच्या संयुक्त विद्यमाने चालू असलेल्या या उपक्रमाला २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात अकरा वर्षे पूर्ण झाली. यावर्षी कोरोना महामारीमुळे उपक्रम प्रत्यक्ष शाळेत राबविण्यात अडचण निर्माण झाली. त्यावर उपाय म्हणून शाळांद्वारे विद्यार्थ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक मिळवून व्हॉट्सॲप गटांच्या माध्यमातून संपर्क चालू ठेवला. तसेच दूरस्थ पद्धतीने तासिकांचे नियोजन केले. या शैक्षणिक वर्षात हा ऑनलाईन उपक्रम पुणे म.न.पा.च्या दहा शाळा, पिंपरी-चिंचवड म.न.पा.च्या दहा शाळा आणि मुळशी-मावळ तालुक्यातील २० शाळा अशा एकूण ४० शाळांमध्ये राबविण्यात आला.

दरमहा केपीआयटी अभियंत्यांचे ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले. वर्षभरात एकूण १२ विज्ञान संकल्पनांवरील आधारित प्रयोग/खेळणी आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांना ज्ञान प्रबोधिनी नियुक्त विज्ञान मित्र आणि केपीआयटी अभियंते यांनी शिकवली.

### ✻ समस्या परिहार स्पर्धा

दि. १७ ते २० मार्च या कालावधीत ऑनलाईन समस्या परिहार स्पर्धा घेण्यात आली. एकूण १०० निवडक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि विजेत्या शाळेतील विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रत्यक्ष शाळेत जाऊन देण्यात आली. एप्रिल महिन्यात समस्या परिहार स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन पाच दिवसीय विज्ञान कार्यशाळा घेण्यात आली.

### समस्या परिहार स्पर्धेत विजेत्या शाळांची नावे पुढीलप्रमाणे -

**मावळ - मुळशी तालुका -**

| क्रमांक | इयत्ता - आठवी | इयत्ता - नववी |
|---|---|---|
| प्रथम | व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, नऱ्हेगाव | व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, नऱ्हेगाव |
| द्वितीय | श्रीराम विद्यालय, नवलाख उंब्रे | महर्षी कर्वे आश्रमशाळा, कामशेत |
| तृतीय | महर्षी कर्वे आश्रमशाळा, कामशेत | गोल्डन ग्लेड्स माध्यमिक विद्यालय, करंजगाव |

**पुणे म.न.पा. आणि पिंपरी-चिंचवड म.न.पा. शाळा -**

| क्रमांक | इयत्ता - आठवी |
|---|---|
| प्रथम | ऑलंपिक वीर खाशाबा जाधव क्रीडानिकेतन, सिंहगड रोड, म.न.पा. पुणे |
| द्वितीय | माध्यमिक विद्यालय, काळभोरनगर, पिं.चिं. म.न.पा. |
| तृतीय | अण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालय, पिंपळे सौदागर, पिं.चिं. म.न.पा. |

## अनुभवशाळा

अनुभवशाळा कार्यक्रम हा प्रकल्प भारत फोर्ज व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने वस्ती पातळीवर इयत्ता पहिली ते सहावीच्या वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी चालवला जातो. हा प्रकल्प पुणे शहरातील कम्युनिटी सेंटर केशवनगर, गायरानवस्ती, केशवनगर व महात्मा फुले वसाहत, हडपसर तीन वस्त्यांमध्ये सुरू आहे. (क्रमशः ६७, ४५, ५७, असे एकूण १६९ विद्यार्थी). सात विविध घटकांसाठी (गाणी, खेळ, हस्तकला, संगणक-वापर व अभ्यास) अभ्यासक्रम तयार करून राबवला जातो.

### ❊ व्हॉट्सॲप गट व शैक्षणिक साहित्य

ऑगस्ट महिन्यापासून हा प्रकल्प व्हॉट्सॲप गटांच्या माध्यमातून संपर्क ठेवत सुरू केला. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव बघता शाळा बंद असतानाही मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी विद्यार्थ्यांना वयोगटानुसार कार्यपत्रके देण्यात आली. विविध निमित्तांनी तेथील शिक्षिका विद्यार्थ्यांच्या गृहभेटी करतात. त्याशिवाय स्थानिक परिस्थिती बघून कोरोना प्रतिबंधक उपाय राबवत पुरेशी काळजी घेत टप्प्याटप्प्याने प्रत्यक्ष अनुभव शाळा तीन्ही ठिकाणी सुरू झाली.

### ❊ पूरक आहार

विद्यार्थ्यांची मानसिकता आणि सातत्य टिकवून ठेवण्यासाठी व शिक्षणाबरोबरच आरोग्यदायी पोषक घटक मिळावे यासाठी खारीक, मनुका, राजगिरा लाडू, खारे शेंगदाणे, खजूर लाडू इत्यादि खाऊ मुलांना घरपोच दिला जातो.

### ♦ विविध प्रकारचे साहित्य

विद्यार्थ्यांसाठी छात्र प्रबोधनतर्फे तयार केलेला बोलका अंक, वाचन वाढावे म्हणून १०० पुस्तकांचा संच दिला. आणि कम्युनिटी सेंटर येथे नवीन सायकल तसेच विविध खेळ असे साहित्य दिले.

### ❊ अनुभव शाळेतील विशेष दिन, राष्ट्रीय सण व उत्सव कार्यक्रम

दरवर्षीप्रमाणे विविध राष्ट्रीय व सांस्कृतिक सण साजरे करण्यात आले. अनेक स्थानिक व प्रबोधिनीतील कार्यकर्ते व सन्माननीय सदस्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. २६ जानेवारीच्या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांबरोबर पालकांचीही उपस्थिती होती. त्याचप्रमाणे मराठी राजभाषा आणि राष्ट्रीय विज्ञान दिनही विशेषत्वाने साजरे करण्यात आले.

### ❊ नाविन्यपूर्ण स्पर्धा

निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, समस्या परिहार स्पर्धा, नाटक स्पर्धा इ. नाविन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एकूण १८६ विद्यार्थी स्पर्धांमध्ये सहभागी झाले. स्पर्धांचा बक्षीस वितरण गुणगौरव समारंभ ६ जाने. रोजी कम्युनिटी सेंटर केशवनगर आणि महात्मा फुले वसाहत, हडपसर या दोन ठिकाणी मा. लीनाताई देशपांडे (सी.एस.आर. प्रमुख, भारत फोर्ज, पुणे) यांच्या हस्ते अतिशय उत्साहात पार पडला.महात्मा फुले वस्ती हडपसर येथील कार्यक्रमात विद्या होडे (सामाजिक कार्यकर्त्या) उपस्थित होत्या.



## प्रज्ञा विकास कार्यक्रम

प्रज्ञा विकास कार्यक्रम हा पुणे शहरातील नागरी वस्तीभागात राहणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाबरोबर सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या हेतूने भारत फोर्ज कंपनीच्या सामाजिक बांधिलकी विभाग यांच्या अर्थसाहाय्यातून २०१४-१५ साली सुरू करण्यात आला. पुणे शहरातील तीन वस्तीभागांमध्ये-जनता वसाहत (पर्वती पायथा), वेताळबाबा वसाहत (हडपसर) व केशवनगर कम्युनिटी सेंटर (मुंढवा) येथे निवड झालेल्या इयत्ता सातवी ते नववीतील विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातील तीन दिवस सायंकाळी वर्ग घेतले जातात.

यावर्षी प्रज्ञा विकास उपक्रमातील समन्वयकांनी ऑनलाइन तासिकेद्वारे स्वयंअध्ययन कौशल्य, मराठी दिवस, विज्ञान दिवस योजण्यात आले. या सर्व तासिकांना तिन्ही वस्तीतील २० विद्यार्थी उपस्थित होते.

### ❊ व्हॉट्सअ‍ॅप गट व शैक्षणिक साहित्य

ऑगस्ट महिन्यापासून हा प्रकल्प व्हॉट्सअ‍ॅप गटांच्या माध्यमातून संपर्क ठेवत सुरू केला. कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव बघता शाळा बंद असतानाही मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी विद्यार्थ्यांना वयोगटानुसार कार्यपत्रके देण्यात आली. विविध निमित्तांनी समन्वयकांनी विद्यार्थ्यांच्या गृहभेटी व वस्ती संपर्क केला. त्याशिवाय काही ऑनलाईन सत्रे घेतली. यामध्ये आयसर, पुणे तर्फे एका सत्राचाही समावेश होता. प्रत्यक्ष सत्रेही काही प्रमाणात झाली. या सत्रांमध्ये स्वविकास, विज्ञान संकल्पना, कोडी, सूर्यनमस्कार इ. चे मार्गदर्शन करण्यात आले.

### ❊ विशेष कार्यक्रम

'घर घर ग्रंथालय' योजना, विद्यार्थ्यांसाठी छात्र प्रबोधनतर्फे तयार केलेला बोलका अंक, ऐपावा उपक्रमातील साहित्य इ. वाटप, एका विद्यार्थिनीला सायकल भेट, एका विद्यार्थ्याचा आय.टी.आय. प्रवेश, १२ वी विद्यार्थ्यांचा शुभेच्छा कार्यक्रम, सूर्यदत्ता ग्रुपतर्फे आयोजित विश्वविक्रमी महामिसळ उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग(१४ मार्च २०२१), रायगड सहल (जनता वसाहत येथील सात माजी विद्यार्थी) तसेच आकाशकंदील निर्मिती व दिवाळी फराळ यासारखे विशेष कार्यक्रम योजण्यात आले.

### ❊ विशेष दिन, राष्ट्रीय सण व उत्सव कार्यक्रम

दरवर्षीप्रमाणे विविध राष्ट्रीय व सांस्कृतिक सण साजरे करण्यात आले. अनेक स्थानिक व प्रबोधिनीतील कार्यकर्ते व सन्माननीय सदस्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. २६ जानेवारीच्या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांबरोबर पालकांचीही उपस्थिती होती. त्याचप्रमाणे राष्ट्रीय विज्ञान दिन (प्रयोग सादरीकरणे) व जागतिक महिला दिन विशेषत्वाने साजरे करण्यात आले.

### ❊ विविध स्पर्धा- परीक्षा

छात्र प्रबोधनतर्फे आयोजित स्पर्धांमध्ये काही विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रकल्पाच्या अंतर्गत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, फोनवरची मुलाखत स्पर्धा (व्यक्तिगत संवाद व प्रश्न कौशल्य), नाटक स्पर्धा, समस्या परिहार स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इ. नाविन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एकूण १४३ विद्यार्थी स्पर्धांमध्ये सहभागी झाले. स्पर्धांचा बक्षीस वितरण गुणगौरव समारंभ ६ जाने. रोजी कम्युनिटी सेंटर केशवनगर आणि महात्मा फुले वसाहत हडपसर या दोन ठिकाणी मा. लीनाताई देशपांडे (सी.एस.आर. प्रमुख, भारत फोर्ज, पुणे) यांच्या हस्ते अतिशय उत्साहात पार पडला. इयत्ता आठवीत राष्ट्रीय पातळीवरील शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS परीक्षेत) यश मिळविलेल्या कु. नम्रता पाटोळे (जनता वसाहत, पर्वती पायथा) व कु. विद्या मखरे (वेताळबाबा वस्ती, हडपसर) यांचे प्रमाणपत्र व

बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. तसेच दहावीच्या परीक्षेत ९० टक्के गुण मिळवून पुढील शिक्षणासाठी फिदा या संस्थेची शिष्यवृत्ती मिळविलेली आदिती चांदगुडे (जनता वसाहत, पर्वती पायथा) या विद्यार्थिनीचे देखील बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. या तीनही विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना भारत फोर्ज आणि ज्ञान प्रबोधिनीने सुरू केलेल्या प्रज्ञा विकास कार्यक्रमामुळे आम्ही हे यश मिळवू शकलो असे सांगितले.

७ जानेवारी रोजी जनता वसाहत मध्ये या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम शिवानंद स्वामी यांच्या हस्ते पार पडला.

***

## विकासमित्र प्रकल्प

*** कार्यक्रम स्वरूप**

वेल्हे तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तसेच खाजगी संस्थेच्या एकूण ४६ शाळा या प्रकल्पात सहभागी झाल्या आहेत. या सर्व शाळांमधील एकूण ५६ वर्गांतील सुमारे १७०० विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प २०१९-२० या पहिल्या वर्षी चालू होता. २०२०-२१ या वर्षात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असल्याने ४७ गावांमध्ये सुमारे १००० विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प चालू होता. या प्रकल्पाअंतर्गत वेल्हे तालुक्यातील मावळ, वाजेघर, आंबवणे, पानशेत या चार विभागांतील विद्यार्थ्यांसाठी व शिक्षणदूत तसेच शिक्षकांसाठी कार्यक्रम योजण्यात आले.

*** नियमित विकासिका –** यावर्षी कोरोना प्रादुर्भावामुळे स्थानिक पातळीवरील उद्भवलेल्या सर्व समस्यांना उत्तरे शोधत गाव पातळीवर विकासिका घेतल्या; संग्रहात्मक प्रकल्प आणि विविध स्पर्धाही आयोजित केल्या गेल्या. त्याशिवाय जेव्हा शक्य झाले तेव्हा शाळा पातळीवरही काही कार्यक्रम झाले. त्याअंतर्गत इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी काही अभ्यास-कौशल्यांचे प्रशिक्षण, इयत्ता दहावीच्या ४०० विद्यार्थ्यांसाठी स्वयं अध्ययन प्रशिक्षण सत्रे तसेच इयत्ता बारावीच्या १५० विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केल्या.

*** शिक्षणदूत प्रशिक्षण–**४५ शिक्षणदूतांची मासिक प्रशिक्षणे झाली. त्यामध्ये चार विभाग समन्वयक व दोन प्रकल्प समन्वयक यांचाही सहभाग होता.

*** शिक्षक प्रशिक्षण–** वेल्ह्यातील गटशिक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा करून वर्षभरात दोन कार्यशाळा घेतल्या. त्याअंतर्गत प्राथमिक शाळांतील ७० शिक्षकांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी कार्यशाळा घेतली. त्याशिवाय मुख्याध्यापकांसाठी 'तंत्रज्ञानसंवर्धन' या विषयावर कार्यशाळा घेतली, ज्यात नऊ मुख्याध्यापक सहभागी होते.

*** शैक्षणिक साहित्य वितरण**

♦ **विद्यार्थ्यांसाठी–** ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित सुबोध द्वैमासिकाचे दोन अंक देण्यात आले, त्यात ६४ पानी दिवाळी अंकाचाही समावेश होता. तसेच कृतिकौशल्यासाठी आकाशकंदील बनविण्याचे साहित्य गाव पातळीवरील विकासिकांमध्ये देण्यात आले. विकासिका सुरू असलेल्या सर्व ठिकाणी सॅनिटायजर व सर्व विद्यार्थ्यांना मास्क दिले गेले. इ. ८ ते १० वीच्या सर्व मुलांना २०२१ ची दिनदर्शिका देण्यात आली.

♦ **शाळांसाठी–** ४६ शाळांमधील इ.५, ८ व ११ वी च्या ५६ वर्गांतील सुमारे २००० विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेला क्रीडा साहित्य व ग्रंथालयासाठी ४० लेखांचे दोन लेखसंच भेट देण्यात आले.

## प्रेरणासेतू-२ उपक्रम

वैविध्यपूर्ण कार्यक्षेत्रांतील तज्ज्ञांकडून भारताच्या विविध प्रांतांतील विद्यार्थ्यांशी संवादातून प्रेरणा जागरण आणि मार्गदर्शनासाठीची रचना म्हणजे प्रेरणासेतू हा उपक्रम. याची योजना ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशनच्या समवेत केली जाते.

यावर्षी पाच सत्रांच्या पहिल्या मालिकेत 'तंत्रज्ञान' या विषयासंबंधी भारतातील-परदेशांतील वक्त्यांनी मांडणी केली. त्यात त्यांच्या करिअर संदर्भातील त्यांचा प्रवास, त्यांचे विविध अनुभव, भविष्यातील संधी, आह्वाने, त्यांच्या तंत्रज्ञानाचा सामाजिक व जागतिक परिणाम असे मुद्दे समाविष्ट होते. विद्यार्थ्यांचा सर्वच सत्रांमध्ये व त्यानंतरही अतिशय उत्साहपूर्ण सहभाग होता. अध्यापकांनी देखील या उपक्रमाचे स्वागत केले. वक्त्यांचे तपशील पुढीलप्रमाणे-

१. रोहित मराठे, पुणे- मोबाईलच्या सॉफ्टवेअरचा विकास

२. गणेश बापट, गोवा-बायोमेकॅनिक्स

३.चिन्मय सोमण, शिकागो, अमेरिका- कृषी तंत्रज्ञानात रोबोटिक्सचा वापर

४. आस्कीन गुलेर यिगीतोग्लू, अमेरिका-आण्विक इंजीनिअरिंग

५. स्नेहा देशपांडे, लंडन, इंग्लंड-उपग्रह तंत्रज्ञान

## संशोधन

ज्ञान प्रबोधिनीच्या शालेय शिक्षणप्रणालीतील विविध उपक्रमांवरील संशोधन सुरू केले. याअंतर्गत मुख्यतः उपक्रमांची परिणामकारकता मोजण्याचे निकष ठरवणे, सद्यःस्थितीतील परिणामकारकता मोजणे आणि उद्दिष्टपूर्तीसाठी अजून काय अपेक्षित आहे यातील अंतर भरून काढण्यासाठी उपाययोजना सुचवणे हे काम अपेक्षित आहे.

२०१९-२० या शैक्षणिक वर्षात ज्ञान प्रबोधिनीच्या विविध शाळांत इयत्ता पाचवीसाठी योजण्यात येणाऱ्या विद्यारंभ उपासनेचा मागोवा घेण्यासाठी संशोधन करण्यात आले.

यावर्षी २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत १९८८-८९ पासून इ. सातवीसाठी योजण्यात येणाऱ्या 'गुणविकास योजनेचा मागोवा' हा प्रकल्प केला. गुणविकास योजना विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांच्या विकासाचे मूल्यमापन करण्यासाठी आखली गेली. जवळपास १४० विद्यार्थी व १० अध्यापकांच्या सर्वेक्षणातून या योजनेचे बदलते स्वरूप समजून घेतले. त्यासाठी अध्यापकांनी काय तयारी केली, कोणत्या क्षमता आत्मसात केल्या आणि विद्यार्थ्यांमध्ये योजनेमुळे काय फरक पडला हे सर्वेक्षणातून शोधले. भविष्यातील सुधारणेसाठी सूचना यातून केल्या आहेत.



# वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र

**※ आढावा**

| | |
|---|---|
| राज्ये | महाराष्ट्र, आसाम, अरुणाचल प्रदेश, गोवा, तेलंगणा, जम्मू काश्मीर, मध्यप्रदेश |
| प्रशिक्षणाचे दिवस | ८० |
| सहभागी शाळा | ३०० |
| सहभागी सदस्य | ४००० |

**※ प्रशिक्षण वर्ग**

**※ तंत्रस्नेही अध्यापकत्व**

(एकूण १६ प्रशिक्षण दिवस व ३५६ प्रशिक्षणार्थी)

हे वर्ष सर्वांसाठीच कामाच्या दृष्टीने अतिशय संघर्षाचे गेले. खासकरून विद्यार्थी आणि शिक्षकांना नेहमीपेक्षा अगदी वेगळ्या पद्धतीने वर्षभर काम करावे लागले. अनेक अध्यापकांना अचानक हा बदल झाल्याने जुळवून घ्यायला वेळ लागला. परंतु कोणत्याही परिस्थितीत शिक्षण चालू राहिले पाहिजे या हेतूने अनेकांनी नवे तंत्रज्ञान शिकून घेतले व वापरात आणले. अध्यापकांचा हा प्रवास जास्त नेटका व्हावा यासाठी यावर्षात 'तंत्रस्नेही अध्यापकत्व' हे सूत्र घेऊन चार प्रशिक्षणे झाली. नवे तंत्रज्ञान, त्यातील मूलभूत गोष्टी, त्यामागचा विचार, नवनवीन साधने, त्याचा सराव असे सर्व विषय या वर्गात झाले. अध्यापकांना अचानक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करायला लागल्याने ही योजना खूप जास्त उपयुक्त होती.

**※ शैक्षणिक लघुपट निर्मिती**

(एकूण ८ प्रशिक्षण दिवस व ५४ प्रशिक्षणार्थी)

या वर्षभरात लघुपटांचा वापर हा इतर वर्षांच्या तुलनेत सर्वात जास्त झाला. इतरांनी तयार केलेले, अन्य माध्यमांवर उपलब्ध असलेले असे अनेक लघुपट/ लहान ध्वनिचित्रफिती अध्यापकांनी वापरल्या. परंतु या सगळ्या साहित्याचे संदर्भ (context) हे खूप वेगवेगळे असतात. त्यामुळे आपण ज्या मुलांना शिकवतो त्यांच्यासाठीचा संदर्भ लक्षात घेऊन शिक्षकांनी स्वतःच असे लघुपट/ लहान ध्वनिचित्रफिती बनवाव्यात याकरिता वर्षभरात दोन प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. दृक्श्राव्य माध्यमाचा वापर प्रभावी पद्धतीने होण्यासाठी काय दृष्टिकोन ठेवावा, त्या माध्यमावर स्वतःचा आशय कसा तयार करावा, त्याची साधने कोणती आणि त्याचे तपशील याबद्दलची मांडणी या वर्गात झाली.

**※ नेतृत्व विकसन**

(एकूण १० प्रशिक्षण दिवस व ११३ प्रशिक्षणार्थी)

मुख्याध्यापक, पर्यवेक्षकांबरोबर अध्यापकांना अनेक ठिकाणी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या नेतृत्वाची जबाबदारी घ्यावी लागते. वर्गात शिकवत असताना, विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधत असताना, त्यांना त्यांच्या आयुष्यात दिशा दाखवत असताना, शालेय व्यवस्थापनातल्या विविध जबाबदाऱ्या घेत असताना, अभ्यासक्रमातल्या विषयांमध्ये विशेष उपक्रम घेताना, शाळेच्या विविध कार्यक्रमांमध्ये, शालेय रचनेतले प्रश्न सोडवताना व शासकीय-संस्थात्मक संपर्क जपताना, अशा अनेक ठिकाणी अध्यापकांना नेतृत्व करायला लागते. हे अधिक प्रभावी पद्धतीने करण्याकरिता या वर्षात या विषयाबद्दल तीन प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. नेतृत्व संकल्पना समजावणे, त्यासाठीची वेगवेगळी कौशल्ये माहिती करून घेणे, त्याचे विविध आविष्कार सांगणे, शालेय रचनेत असलेल्या

नेतृत्वाच्या विविध संधी शोधणे आणि त्यामार्फत शाळेच्या गुणवत्ता वाढीचा विचार करणे अशाप्रकारे कार्यशाळेचे नियोजन केले होते.

**⁂ इतिहास अध्यापन प्रशिक्षण वर्ग**

ज्ञान प्रबोधिनीच्या पाच प्रशालांच्या इतिहास अध्यापकांसाठी इतिहास अध्यापन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन २ ते ६ फेब्रुवारी मध्ये केले होते. प्रबोधिनीच्या इतिहास अध्यापनाच्या भूमिका, अध्यापन आशय आणि प्रक्रिया यांचा संबंध, इतिहास शिकवण्याची विविध साधने आणि त्यांचा प्रभावी वापर (भित्तीचित्रे, कालरेषा, क्षेत्रभेटी, कथाकथन, पद्यगायन इ.) इतिहासातील चिकित्सक विचार आणि आजच्या सगळ्या विविध सामाजिक वादांमधला इतिहास आणि तो शिकवण्याची अध्यापकांची भूमिका अशी साधारण सत्रे झाली.

**⁂ विविध संस्था साहचर्य**

**⁂ रोटरी क्लब – प्रशिक्षणे**

गेली अनेक वर्षे शिक्षक प्रशिक्षण केंद्र आणि रोटरी क्लब ऑफ पुणे मार्फत अनेक शाळांमधील शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले जाते. यावर्षी प्रत्यक्ष शक्य नसतानासुद्धा ऑनलाईन माध्यमाद्वारे रोटरी क्लब ऑफ पुणे - नॉर्थ, मेट्रो, सारसबाग यांच्याबरोबर प्रशिक्षण वर्ग झाले. शालेय गुणवत्ता समृद्धी हे सूत्र घेऊन प्रशिक्षणे झाली. अनुभव शिक्षण, तंत्रज्ञानाधारित शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, कथाकथन, वर्गव्यवस्थापन, समृद्ध शालेय वातावरण अशा विषयांची दोन/तीन दिवसांची प्रशिक्षणे घेतली. सर्व मिळून २६५ सदस्य सहभागी झाले.

**⁂ परामिता स्कूल्स, करीमनगर**

गेली चार वर्षे 'परामिता स्कूल्स' या संस्थेसाठी शिक्षण प्रशिक्षण केंद्रातर्फे काम सुरू आहे. 'प्रकल्पाधारित शिक्षण' हे सूत्र घेऊन गेले वर्षभर ऑनलाईन पद्धतीने काम झाले. प्रथम सत्रात त्यांना प्रकल्पासाठी आवश्यक कौशल्य विकसनासाठी कृतीपत्रिका तयार करण्यात आल्या. दुसऱ्या सत्रात दोन महिन्यांचे लघुप्रकल्प विद्यार्थ्यांनी केले. एकूण ६०० प्रकल्प यातून तयार झाले. त्यातील निवडक ९० प्रकल्पांचे अंतिम परीक्षण ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी करून त्यातील १८ प्रकल्प निवडले.

**⁂ गोवर्धन गुरुकुल (ISCKON, वाडा)**

**पुणे भेट**

दिनांक १८-१९ जानेवारी रोजी पालघर, वाडा येथील ISKCON मंदिरातील दोन ब्रह्मचारी प्रबोधिनी भेटीसाठी पुण्यात आले होते. प्रज्ञा विकास कार्यक्रम, विवेक इंस्पायर, विकासमित्र, छोटे सायंटिस्ट्स, ज्ञानसेतू, संवादिनीचे उपक्रम, बाल विकास शिबिरे यांचा परिचय त्यांना करून देण्यात आला. वेल्हे भागात क्षेत्रभेट योजण्यात आली. त्यामध्ये मुलींचे वसतिगृह, साखर गावात विकासमित्रची तासिका, जास्वंद वर्ग ही कामे त्यांना दाखवण्यात आली.

**प्रत्यक्ष प्रशिक्षण**

दिनांक ८ ते १० फेब्रुवारी या कालावधीत वाडा, पालघर इथल्या इस्कॉन संस्थेच्या गोवर्धन गुरुकुल च्या १५ शिक्षकांचा प्रशिक्षण वर्ग झाला. 'स्वाध्याय प्रवचन' हे वर्गाचे मुख्य सूत्र होते. 'स्व' संकल्पना, त्याच्या विकासासाठीचा स्वाध्याय, शिकण्याची कला, 'प्रवचन' संकल्पना, स्वाध्याय प्रवचनासाठी उपक्रमांची योजना असे विषय घेण्यात आले. त्याच दरम्यान गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे देखील शिबिर तिथे घेण्यात आले. 'स्व' ओळख, प्रतिभाशाली विचार, पद्यगायन, बरचीनृत्य, क्रीडा दल, अभंगगायन अशा प्रकारची सत्रे मुलांच्या शिबिरात झाली.



## शै. उ. सं. द्वारा आयोजित प्रशिक्षणांचे तपशिल

| क्रमांक | तारीख | सहभागी सदस्य | प्रशिक्षण दिवस | माध्यम | संस्था | प्रशिक्षण विषय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल | २०० | १ | मराठी | भोसला मिलिटरी | अनुभवाधारित शिक्षण |
| २ | एप्रिल | १००० | ३ | मराठी | खुले सत्र | कोविड काळातील ऑनलाईन शिक्षण |
| ३ | १-४ जुलै | ३५ | ४ | मराठी | खुले सत्र | निरीक्षण कौशल्य |
| ४ | २५ जुलै | ७० | १ | मराठी | खुले सत्र | ग्रामरलीची ओळख |
| ५ | ३-७ ऑगस्ट | २५ | ४ | मराठी | खुले सत्र | जिओजेब्राची ओळख |
| ६ | २१ ऑक्टोबर | २०० | १ | मराठी | खुले सत्र | शालेय व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा वापर |
| ७ | ६-७-२१ मार्च | २२ | ३ | मराठी | अहमदनगर संपर्क (डॉ. अंशू मुळे) | स्वयं अध्ययन कौशल्य |

## वेबिनारमधील सहभाग


| क्रमांक | तारीख | सहभागी सदस्य | प्रशिक्षण दिवस | माध्यम | संस्था | प्रशिक्षण विषय | वक्ते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुलै | | १ | मराठी | शिक्षण विकास मंच | कोविड काळातील शिक्षण | प्रशांत दिवेकर |
| २ | २९ ऑगस्ट | ५०० | १ | इंग्रजी | प्रांगण, मुंबई | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | प्रशांत दिवेकर |
| ३ | १४ मार्च | १००० | १ | इंग्रजी | IIT दिल्ली | सामाजिक शास्त्रांचे महत्त्व | प्रशांत दिवेकर |

### ❊ ई – प्रशिक्षक

वर्षभरात १२ ई-अंक साधारण ४००० लोकांपर्यंत पोचवले. शिक्षण क्षेत्रातले विविध प्रयोग, परदेशातील शिक्षण पद्धती, पूरक शिक्षणातील प्रयोग असे अनेक विषय मासिकात हाताळले गेले. प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. मा. वामनराव अभ्यंकर यांच्या कार्यासंबंधी एक विशेषांक देखील काढण्यात आला.




प्रज्ञा विकास कार्यक्रम




ज्ञान सेतू वेबसाईट




पार्वतीपूर विद्यार्थी प्रशिक्षण



छोटे सायंटिस्टस् – ऑनलाईन समस्या परिहार स्पर्धा





## शैक्षणिक उपक्रम संशोधिका,
## ज्ञान प्रबोधिनी

पत्ता : ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

दूरभाष : ०२०-२४२०७२०९ / २४२०७१२७

contact.earc@jnanaprabodhini.org